**तत्काळ** **महाराष्ट्र शासन**

क्र. प्रतिनि-२०१७/प्र.क्र.१३३/का-१४
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०६.११.२०१७

**प्रति,**

सह सचिव/उप सचिव, (आस्था)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

**विषय-** प्रतिनियुक्तीने पदे भरण्याबाबत.

**संदर्भ-** १.सम क्रमांकित दि.२५.९.२०१७ चे पत्र व दि.१.११२०१७ चे स्मरणपत्र.
२. शासन पत्र क्र.प्रतनि-२०१७/प्र.क्र.१३६/का-१४, दि.११.१०.२०१७

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये विविरण-अ येथील नमूद पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता मंत्रालयीन विभागातील सह/उप सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात आल्या होत्या.

**विवरण-अ (सह/उप सचिव संवर्गाकरीता)**

| अ.क्र. | प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदनाम व स्थळ |
|---|---|
| १ | प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, नागपूर |
| २ | प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती |
| ३ | कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर |
| ४ | सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई |
| ५ | उप सचिव, राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठ |
| ६ | उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ |
| ७ | उप सचिव, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ |
| ८ | उप सचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ |
| ९ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्त विकास महामंडळ मर्यादित, मुंबई |
| १० | महाव्यवस्थापक (क.व औ.सं.), म.रा.परिवहन मार्ग |
| ११ | सहायक संचालक, विमान चालन संचालनालय, मुंबई |
| १२ | संचालक, पर्यटन संचालनालय |
| १३ | (#) व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ |

**(#) व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता मंत्रालयीन विभागातील सह / उप सचिव संवर्गामधील अधिकाऱ्यांकडून नव्याने इच्छुकता मागविण्यात येत आहे.**

तसेच संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये विवरण-ब येथील नमूद पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता मंत्रालयीन विभागातील अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात आल्या होत्या.

**विवरण-ब (अवर सचिव संवर्गाकरीता)**

| अ.क्र. | प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदनाम व स्थळ |
|---|---|
| १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव |
| २ | अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई |
| ३ | उप कार्यकारी अधिकारी, सिध्दीविनायक गणपती मंदिर, मुंबई |
| ४ | अवर सचिव, प्रवेश नियामक व शुल्क नियामक प्राधिकरण बांद्रा, मुंबई |
| ५ | उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई |
| ६ | उप संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई |
| ७ | प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य व बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई |

२. **उपरोक्त विवरणपत्र-अ मधील अ.क्र.११ येथे नमूद सहायक संचालक, विमान चालन संचालनालय, मुंबई हे पद सह/उप सचिव संवर्गाऐवजी अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील असे वाचावे. तसेच विवरणपत्र-ब मधील अ.क्र.३ येथील उप कार्यकारी अधिकारी, सिध्दीविनायक गणपती मंदिर, मुंबई हे पद अवर सचिव संवर्गाऐवजी कक्ष अधिकारी संवर्गामधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील असे वाचावे.**

उपरोक्त विवरणपत्र “अ” व “ब” मधील नमूद पदांकरीता मंत्रालयीन विभागातील सह सचिव/ उप सचिव व अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांकडून दि.३१.१०.२०१७ पर्यंत इच्छुकता मागविण्यात आल्या होत्या. अद्यपि मंत्रालयीन विभागातील सह/ उप सचिव व अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांकडून याबाबत इच्छुकता प्राप्त झालेल्या नाहीत.

३. आता मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांमधून खालील विवरणपत्र-क येथे नमूद केलेली पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत.

**विवरण-क (कक्ष अधिकारी संवर्गाकरीता)**

| अ.क्र. | प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदनाम व स्थळ |
|---|---|
| १ | सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा, नवी मुंबई |
| २ | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, मुख्यालय |
| ३ | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ, नाशिक |
| ४ | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर |
| ५ | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, मुंबई |

४. मंत्रालयीन विभागातील सह/ उप सचिव व अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांमधून उपरोक्त विवरणपत्र अ,ब व क येथील नमूद प्रतिनियुक्तीची पदे भरण्याबाबतचा कालावधी दि.१४.११.२०१७ पर्यंत वाढविण्यात येत आहे. तरी, आपल्या विभागातील प्रतिनियुक्तीसाठी इच्छुक अधिकाऱ्यांची माहिती दि.१४.११.२०१७ पर्यंत पाठवावी.

५. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७११०६१५४६४२९४०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2017.11.06 15:50:15 +05'30'

**( ग.भि.गुरव )**
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग**